# इस्राएल-पॅलेस्टाईन

## चन्द्रशेखर पुरन्दरे

### पार्श्वभूमी

इस्राएल-पॅलेस्टाईन संघर्ष अर्ध्या शतकाहून अधिक काळ चालू आहे. [या नावाने नाही पण अरब-ज्यू संघर्ष त्याही आधीपासून.] पंधराव्या शतकापासून ज्यूंचा युरोपमध्ये धार्मिक छळ सुरू झाला, तेव्हापासून त्यांची पॅलेस्टाईन प्रदेशात घरवापसी सुरू झाली. एकोणिसाव्या शतकात स्वतंत्र ज्यू राष्ट्राची संकल्पना पुढे आली, मग दुसऱ्या महायुद्धात हा छळ वाढला, विशेषत: जर्मनीत त्यांचे वांशिक शिरकाण झाले. तेव्हा त्यावेळच्या पॅलेस्टाईनमध्ये ज्यू लोकांसाठी स्वतंत्र देश असावा ही संकल्पना पुढे आली. नंतर १९४८ ला स्वतंत्र इस्राएल अस्तित्वात आला तो पश्चिमेच्या अपराधी भावनेतून. देश आज संपन्न झाला कारण ज्यूंची उद्योजकता, अमेरिकन पैसा आणि लष्करी मदत. ज्यूंच्या आगमनाने पॅलेस्टाईनचा नकाशा बदलला, बदलत गेला. तो आजवर निश्चित नाही.

### युद्धे

अरब लीग या अरब राष्ट्रांच्या संघटनेने पॅलेस्टाईनच्या वतीने इस्राएलविरुद्ध १९४८ला लगेचच युद्ध सुरू केले. १९४९ला तथाकथित पॅलेस्टाईनचे दोन प्रमुख भाग होते - वेस्ट बँक [जॉर्डन नदीच्या पश्चिम काठावरील प्रदेश] व गाझा प्रदेश - तो वेस्ट बँकेशी संलग्न नाही, भूमध्य समुद्राला लागून आहे. [नकाशा] यातील वेस्ट बँक प्रांत जॉर्डन देशाने '५० साली ताब्यात घेतला व गाझा प्रांत इजिप्तने '४९ मध्ये. मग १९६४ला यासर अराफतच्या नेतृत्वाखालील पॅलेस्टाईन मुक्ती संघटना [PLO] स्थापन झाली. ती आंतरराष्ट्रीय पातळीवर पॅलेस्टाईन प्रश्नाची अधिकृत संघटना झाली. नंतर १९६७च्या युद्धात इस्राएलने वेस्ट बँकेवरील जॉर्डनचे आणि गाझावरील इजिप्तचे आधिपत्य संपवले. दोन्ही प्रदेश आपल्या लष्कराखाली आणले. [याला सहा दिवसांचे युद्ध म्हणतात.] त्यामुळे PLO ला प्रथम जॉर्डनमध्ये व नंतर ट्युनिशिया देशात स्थलांतर करावे लागले. म्हणजे, ज्या भूप्रदेशाच्या मुक्तीसाठी ही संघटना स्थापन झाली, तिला त्या प्रदेशातूनच परांगदा व्हावे लागले. जहाल पॅलेस्टिनी लेबॅनॉन देशात गेले व त्यांनी इस्राएलविरुद्ध कारवाया चालू ठेवल्या. नंतर लेबॅनॉन - PLO, इस्राएल-लेबॅनॉन अशी बरीच युद्धे झाली. दरम्यान १९७९-८०ला इजिप्तने इस्रायलशी राजनैतिक संबंध प्रथापित केले व पॅलेस्टाईन प्रश्नाचे अरब समर्थन त्याप्रमाणात कमी झाले.

### इंतिफादा

इस्राएलच्या '६७ पासूनच्या पॅलेस्टाईनच्या नियंत्रणाविरुद्ध असंतोष खदखदत होता. त्याचा उद्रेक '८७च्या डिसेंबरमध्ये झाला. [त्याला इंतिफादा म्हणतात. शब्दश: अर्थ कंपन] निषेध मोर्चे, इस्रायली पोलीस व सैनिकांवर दगडफेक, मोलोटोव्ह कॉकटेल हे छोटे बॉम्ब फेकणे, इस्राएलच्या दृश्य संस्थांवर हल्ले असे हिंसक दंगे वेस्ट बँक, गाझा आणि इस्राएलमध्येही उसळले. [इस्राएलच्या लोकसंख्येत २०-२१ टक्के अरब आहेत.] इस्राएलने ८०,००० सैनिक तैनात केले पण नागरी हिंसा चालूच राहिली. एका अंदाजानुसार सुरुवातीच्या दिवसात तीनशेहून अधिक पॅलेस्टिनी आणि १०-१२ इस्रायली मरण पावले. बळींच्या संख्येतील तफावत सामर्थ्याचे असंतुलन दर्शवते. महत्त्वाचा तह व्हायला १९९३ साल उजाडले. तेव्हा नॉर्वेच्या पुढाकाराने व अमेरिकेच्या पाठिंब्याने Oslo करारावर PLO तर्फे अराफत आणि इस्राएलतर्फे तेव्हाचा पंतप्रधान राबिन यांनी सह्या केल्या. त्यानुसार PLO ला वेस्ट बँक आणि गाझामध्ये येण्याची परवानगी मिळाली आणि अखेर परदेशातून PLO मायदेशी आली. या कराराने PLO ने इस्राएलचे अस्तित्व मान्य केले पण पॅलेस्टाईनला स्वतंत्र देश म्हणून मान्यता मिळाली नाही. PLO ला वेस्ट बँकेत आणि गाझामध्ये मर्यादित अधिकार मिळाले, म्हणजे PLO फक्त स्थानिक संस्था राहिली. ती पॅलेस्टिनी

लोकांचे अधिकृत प्रतिनिधी आहे एवढीच मान्यता इस्राएलने दिली. या कराराविरुद्ध जहाल पॅलेस्टिनी गटाने निषेध, इस्राएलवर हल्ले सुरु केले, इस्राएलमध्येही विरोध झाला, त्यात इस्राएली पंतप्रधानांचा '९६ साली खून झाला. मग Oslo कराराद्वारे शांतता आणण्याची प्रक्रिया थंडावली आणि परत धुमसता असंतोष, त्यावर इस्राएलची अवाजवी हिंसा हे दुष्टचक्र चालू राहिले. त्याचा परिणाम म्हणून २०००ला दुसरा इंतिफादा सुरू झाला. तो चार-पाच वर्षे चालला. तेव्हापासून आजवर अनेक आंतरराष्ट्रीय प्रयत्न शांतता आणण्यासाठी झाले. Oslo करारासारखेच ते सगळे अयशस्वी झाले आहेत.

**विस्तारवाद**

दरम्यान जमीन बळकाव मोहीम इस्राएलने '७०च्या दशकापासून चालू केली होती. इस्राएली नागरिकांना सुरुवातीला गोलन टेकड्या या सीरियन प्रदेशात, सीनाई या इजिप्शिअन प्रदेशात व वेस्ट बँक या पॅलेस्टिनियन प्रदेशात वसवण्यात आले. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार हे इतर देशांवर बेकायदेशीर अतिक्रमण होते व आहे. इजिप्तबरोबर समेट झाल्यावर इस्राएलने तेथील वसाहती काढून घेतल्या. सीरियातील अतिक्रमणाला तर ट्रम्प महाशयांनी इस्राएलचा भाग म्हणून मान्यताही दिली. त्याबद्दल कृतज्ञता म्हणून तेथील एका वसाहतीला 'ट्रम्प हाईट्स' असे नाव २०१९ला देण्यात आले. वेस्ट बँकेतील वसाहती वाढतच आहेत. त्या इस्राएली लष्कराच्या संरक्षणात असतात.

**जाचक नियंत्रण**

परत पॅलेस्टाईनच्या अंतर्गत परिस्थितीकडे वळता, मागच्या एका लेखात म्हटल्याप्रमाणे इस्राएली नियंत्रणाने पॅलेस्टाईन, विशेषत: गाझा [लोकसंख्या -२० लाख] जालियानवाला बाग झाला आहे. कोण कोठे जातो, मालाची वाहतूक, पाणीपुरवठा, इजिप्तशी होणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक वगैरे सर्व गोष्टींवर इस्राएलचे नियंत्रण आहे. वेस्ट बँकेतही थोडीफार मवाळ पण हीच परिस्थिती आहे, [लोकसंख्या २७ लाख, अधिक सव्वाचार लाख इस्रायली वसाहतीतील ज्यू लोक] तोच प्रकार पूर्व जेरुसलेममध्ये. [ते पुढे पाहू.] ज्यू वसाहतीतून जाणारे मार्ग अरबांना बंद असतात. अंतर्गत दळवळण, दैनंदिन जीवन मुश्किल आहे. अराफतचा फतेह हा गट वेस्ट बँकेत सत्तेवर आहे. २००६ साली हमास या जहाल मुस्लिम गटाला गाझाच्या निवडणुकात विजय मिळाला. या दोघांचे पटत नाही. अमेरिकेने हमास ही अतिरेकी संघटना म्हणून जाहीर केली आहे. हमास इस्राएलच्या सतत कुरापती काढत असतो. कुरापती म्हणजे प्रामुख्याने इस्राएलच्या नागरी वस्त्यांवर रॉकेट्स सोडणे. त्यात हत्या झाली तर तेवढा विजय. या रॉकेट्सवर आळा घालण्यासाठी इस्राएलने विशेष तंत्रज्ञान विकसित केले आहे. हा रॉकेट्स निष्प्रभ करणारा तांत्रिक 'घुमट' आहे. तो येणारे रॉकेट वेधतो व निष्प्रभ करतो.

**जेरुसलेम**

इस्राएल-पॅलेस्टाईन वादात वेस्ट बँक व गाझाबरोबर पूर्व जेरुसलेम या शहराचाही मुद्दा आहे. ज्यू, ख्रिश्चन व मुस्लिम तिन्ही धर्मांच्या अनुयायांसाठी जेरुसलेम हे तीर्थस्थान आहे. [या प्रश्नाचा सविस्तर आढावा जानेवारी २०१८च्या *आंदोलन* मध्ये घेतला आहे] ज्यूंच्या श्रद्धेप्रमाणे ते भगवंताचे प्राचीन वसतीस्थान होते. त्यांना तेथील Temple Mount हे पवित्र स्थान आहे. ख्रिश्चनांसाठी ख्रिस्ताचा जन्म व पुनरागमन तेथे झाले. मुस्लिमांसाठी मक्का, मदिनेनंतर जेरुसलेम पवित्र कारण प्रेषित मोहम्मदाने तेथील अल-अकसा मशीद तीर्थस्थळ म्हणून जाहीर केली आणि त्याचे स्वर्गारोहणही जेरुसलेमहूनच झाले. Temple Mount आणि अल अकसा मशीद एकाच परिसरात आहेत.

**वर्तमान**

सध्याचा हिंसाचार जेरुसलेममध्ये सुरू झाला. रमझान हा मुस्लिमांचा पवित्र महिना. तेव्हा मोठ्या संख्येने मुस्लिम अल-अकसा मशिदीला जातात. '६७च्या युद्धात याच सुमारास पूर्व जेरुसलेम जॉर्डनकडून घेऊन दोन्ही जेरुसलेमचे [पूर्व व पश्चिम] एकत्रीकरण झाले. ते दिवस ही इस्राएलमध्ये राष्ट्रीय सुट्टी असते. [यावर्षी ९ मे सूर्यास्त ते १० मे सूर्यास्त] हा विजयदिवस मानला जातो आणि ज्यू तो दिवस Temple Mount वर जाऊन साजरा करतात. या वर्षीही दोन्ही धर्मीय त्यांचे उपचार करायला निघाले. इतर ज्यूंबरोबर अति-उजव्या ज्यूंची वार्षिक मिरवणूकही तेथून जाणार होती. ती वस्ती मुस्लिमबहुल. त्याआधी काही दिवसच संलग्न भागातील पॅलेस्टिनी रहिवाशांना हुसकावून लावण्याची मोहीम सरकारने सुरू केली होती. हे सगळे रसायन ज्वालाग्राही. ज्यूंची मिरवणूक सुरू झाली पण हमासची रॉकेट्स

येऊ लागल्यावर रद्द करण्यात आली. भाविक मुस्लिमांना आधी अल-अकसाच्या बाहेरच अडवण्यात आले, नंतर जाऊ दिले गेले पण तोपर्यंत तणाव वाढला होता. त्यात विस्थापनाचा संताप. त्यामुळे दंगा सुरू झाला. तो पसरला. इस्राएलपुरता मर्यादित न रहाता गाझा, वेस्ट बँक येथेही दंगली सुरू झाल्या. मग इस्राएलने लष्करी दमनशाही सुरू केली, हमासने इस्राएलवर रॉकेट्सचा वर्षाव सुरू केला. अल्पावधीतच हमासच्या रॉकेट्समुळे १०-१२ इस्राएली मरण पावले तर इस्राएली हवाई हल्ल्यात अडीचशेहून अधिक गाझामधील पॅलेस्टिनी. त्यात स्त्रिया व मुले अधिक. कारण हल्ले राहत्या घरांवर झाले, इस्राएलचा दावा असा की अतिरेकी निवासी इलाक्यात रहातात जेणेकरून इस्राएल त्यावर हल्ले करायला कचरेल. तसे झाले नाही. काही गगनचुंबी इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या. पाणी व वीज पुरवठा खंडित झाला. लढाई ११ दिवस चालली. मग थांबली आणि लेख लिहिण्याच्या वेळी परत सुरू झाली आहे. दरम्यान इस्राएलचा बारा वर्षे पंतप्रधान असणारा व पॅलेस्टिनींविरुद्ध कडवी भूमिका घेणारा पंतप्रधान पदच्युत झाला. नवीन सरकार आल्याच्या तीन दिवसातच परत हिंसा उफाळली आहे.

**निरीक्षणे**

- इस्राएल व पॅलेस्टाईन ही दोन स्वतंत्र राष्ट्रे असावीत हा आजवरच्या जागतिक पुढाकाराच्या सगळ्या शिखर परिषदांचा प्रयत्न. तो मुळात इस्राएलला मान्य नाही. मग इस्राएल परिषदांमध्ये काहीही म्हणो. म्हणजे प्रयत्नांचे गृहीतच चूक आहे. अमेरिकाच इस्राएलला द्विराष्ट्र तत्त्वाकडे वळवू शकेल. ते ती करत नाही. आज फारतर जागतिक मत आपल्याविरुद्ध जाईल हा इस्राएलचा होरा आहे आणि ती किंमत त्याला स्वीकाराई आहे. इस्राएलचा एक माजी पंतप्रधान म्हणाला होता - अमेरिका आम्हाला शस्त्रे पुरवते, पैसे पुरवते आणि सल्ला देते. आम्ही शस्त्रे घेतो, पैसे घेतो पण सल्ला मानत नाही. [पाकिस्तान-अमेरिका समीकरण.] अर्थात अमेरिकेला हे कळत नाही असे नाही पण अमेरिकेतील राजकारण्यांचे ज्यू लॉबीशी असलेले व इतर हितसंबंध ते दुखावू धजत नाहीत.

- आजवर शांतता आणण्याचे सर्व प्रयत्न 'वरून खाली' झाले. प्रयत्न व्हायला हवेत ते तळातल्या पॅलेस्टिनींना सक्षम करण्याचे. त्यांचे मानवी हक्क राखणे, त्यांना किमान प्रतिष्ठेने जगता येईल असे धोरण आखणे याला प्राधान्य हवे. त्यांचे स्वत:चे सरकारच ते करत नाही तर इस्राएल करणारच नाही. वेस्ट बँकेत १५-२० टक्के तर गाझामध्ये ४० टक्केहून जास्त बेरोजगारी आहे, नागरी सुविधा नाहीत, जाचक निर्बंध आहेत व इस्राएलच्या चढाईची सततची टांगती तलवार आहे. या साऱ्या कोंडीला हिंसक वाचा फुटते.

- वेस्ट बँकेच्या पॅलेस्टाईनला समर्थ नेतृत्व नाही. अध्यक्ष अब्बास गेली १७ वर्षे त्या पदावर आहे. त्याचा कार्यकाळ वस्तुत: चार वर्षेच असणे अपेक्षित होते. त्याची राजवट अतोनात भ्रष्ट आहे. यासर अराफतच्या काळातही पॅलेस्टाईनला जगाने केलेल्या मदतीतील किमान १ बिलियन डॉलर्स गायब झाले, म्हणजे नेतृत्वाच्या खिशात गेले असा अंदाज आहे.तीच परंपरा चालू आहे.

- हमास 'अतिरेकी' संघटना असल्याने गाझावर आंतर-राष्ट्रीय निर्बंध आहेत. शिवाय तेथेही सत्ताधारी भ्रष्ट आहेत. त्यामुळे सामान्य माणसाची परिस्थिती अधिकाधिक हलाखीची होत आहे. अब्बास आणि हमास वस्तुत: इस्राएलचे हितसंबंध राखत आहेत, त्यांच्या स्वत:च्या लोकांचे नाही असे म्हणता यावे.

- भूमीचे स्वामित्व, धर्म आणि श्रद्धा यांचे विखारी मिश्रण हेही एक कारण आहे. मागच्या लेखात म्हटल्याप्रमाणे, केवळ कल्पना म्हणून जर असे मानले, की संबंधित मुस्लिमांनी आणि ज्यूंनी त्यांच्या श्रद्धांना मुरड घातली, तर जेरुसलेम 'पवित्र' रहातच नाही. 'पॅलेस्टाईन देशाची राजधानी जेरुसलेमच' या पूर्व-अटीवर पॅलेस्टाईन वाटाघाटीत उतरतो. श्रद्धा नसेल तर या भूमिकेचा पायाच हादरतो. तीच गोष्ट ज्यूंची. ते होणे नाही. [त्यात भर म्हणून ट्रम्पने इस्राएलची राजधानी म्हणून जेरुसलेमला मान्यता दिली आणि अमेरिकन दूतावास तेल-अवीवहून जेरुसलेमला हलवला.]

- लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, पॅलेस्टाईनच्या सीमा नक्की नाहीत, सरकारचे प्रभावक्षेत्र अनिश्चित आहे. मग पॅलेस्टाईन हा आज काल्पनिक देश ठरतो. वास्तवात तो अस्तित्वातच नाही. तो कसा असावा याबाबत सामान्य माणसाचे

**(पान ३६ वर)**

(जगभर: पान ३४ वरून)




मत सत्ताधाऱ्यांच्या खिजगणतीत नाही. राष्ट्र-राज्याच्या व्याख्येनुसार परकीय हस्तक्षेपाखेरीज एका भूप्रदेशावर त्याची संपूर्ण सत्ता असली पाहिजे. तसेच त्याच्या नागरिकांना स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. या दोन्ही कसोट्यांवर पॅलेस्टाईन हे राष्ट्र-राज्य ठरत नाही. त्यामुळे सामान्यांची मुस्कटदाबी वाढते कारण तारणहारच नाही. आज आपल्याला 'हे' सरकार अन्यायी आहे म्हणण्याची जी सोय आहे, ती तेथे जनतेला उपलब्ध नाही.

purandarearts.com
art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk